# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५९** **दिनांक १४/०६/२०२१**

## हॉटेल चेना गार्डन आस्थापनेमध्ये बेकायदेशीर हुक्का पार्लरवर काशिमीरा पोलीस स्टेशनकडुन छापा कारवाई

दिनांक १४/०६/२०२१ रोजी रात्रौ ०१.२० वाजताचे सुमारास घोडबंदर रोड, ता.जि. ठाणे येथील हॉटेल चेना गार्डन या आस्थापनेच्या ठिकाणी आस्थापना मालक आरोपीत नामे १)तरविंदर प्रल्हाद किर,वय-४७ वर्ष, याच्या सांगणे वरुन व संमतीने आर्थिक फायदयाकरीता आस्थापनेचा कॅशिअर/मॅनेजर नामे २)चार्ल्स लुईस कुला, वय-४३ वर्ष तसेच वेटर नामे ३)राजेश प्रशांत सालीस,वय-४७ वर्ष, ४)अजय मच्छिंद्र शिंदे, वय-३२ वर्ष, ५)श्रवण जनक साहु,वय-२५ वर्ष यांनी सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या ग्राहकांना तंबाखुजन्य हुक्का व मदय बेकायदेशीररित्या पिण्याकरीता उपलब्ध केले तसेच ग्राहकांच्या समोरील टेबलावर हुक्क्याचे पात्र, त्यावर जळता कोळसा ठेवून मानवी जिवन धोक्यात येईन असे हयगयीचे कृत्य केले तसेच कोरोना या महामारीच्या पार्श्वभुमीवर कंडीशनल लॉक डाउनच्या कालावधीत राज्य शासन, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मिरा-भाईंदर महानगरपालीका कार्यालय व पोलीस आयुक्त कार्यालय, मि.भा.व.वि. यांनी दिलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करुन हॉटेल आस्थापनेच्या आड बेकादेशीर हुक्का पार्लर चालविले व राज्य उत्पादन शुल्क विभागाचा मद्य विक्री बाबतचा परवाना नसतांना बेकायदेशीररित्या ग्राहकांना मदय पुरविण्याकरीता मद्याचा साठा केला तसेच आरोपी ग्राहक नामे ६) डेल डॉमनिक कारडोज,वय-२७ वर्ष, ७) कृष्णा रामचंद्र चव्हाण, वय-२८ वर्ष, ८) रेयान नसीमअहमद चिंदे,वय-३७ वर्ष, ९) फहाद जाफर खान,वय-२७ वर्ष, १०) शक्ती नरपतसिंग शेखावत, वय-३८ वर्ष, ११) मुनवर जमशेद खान,वय-४० वर्ष, १२) यशवंत राजधवल यादव,वय-३९ वर्ष, १३) कुमारी हेतल रमेश मेरीया, वय-२३ वर्ष, १४) कुमारी शाहीदा अब्दुल्ला शेख, वय-३२ वर्ष, १५) कुमारी गिता अरुण सिंग,वय-२६ वर्ष, १६) कुमारी प्राची मनिष सिंग,वय-२१ वर्ष असे सदर ठिकाणी प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पित असतांना मिळून आले. सदर ठिकाणी १०,९८०/-रुपये किंमतीचा प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का व साहीत्य तसेच २८२०/-रुपये किंमतीचे विदेशी मदय मिळुन आल्याने काशिमीरा पोलीस ठाणे यांनी सदर ठिकाणी छापा कारवाई करुन वरील इसमांचे विरुध्द गुन्हा रजि.क्र ाा ४३६ /२०२० कलम १८८, २६९, २७०, २७२, २८५, ३३६, ३४ भा.दं.वि. सह कलम ४, २१, २७ कोप्ता ॲक्ट सह कलम ६५(ई) प्रोहिबिशन ॲक्ट सह कलम २, ३, ४ साथ रोग प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक महेंद्र भामरे हे करीत आहे.

सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त,परि-०१, श्री. विलास सानप, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.संजय हजारे, वपोनि. काशिमीरा पोलीस स्टेशन, सपोनि. महेंद्र भामरे, पोहवा. दिनकर कोल्हे, पोना/सुरेश शिंदे, पोना/बाळु घुगे, पोशि.स्वप्नील मोहीले, पोशि/बाळु आव्हाड, पोशि/सुधीर खोत, पोशि/संतोष तायडे, पोशि/शरद नलावडे, पोशि/सचिन मोरे यांनी केली आहे.

------oooooo------